


आज दर्पन दिन....
दर्पनदिनानिमित्त सर्व पत्रकार बांधवांना हार्दिक शुभेच्छा..

www. sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १०२ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.६ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# पुढील ४८ तासांत राज्यात पावसाची शक्यता

## कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात इशारा, आणखी एक वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय होणार

**पुणे**–राज्यातील अनेक जिल्ह्यांत काल अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. ऐन हिवाळ्यात अनेक ठिकाणी पावसाचा सरी कोसळल्या. आता पुढील ४८ तासांत राज्यात पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. दरम्यान राज्यातील किमान तापमानात वाढ झाल्याने थंडी कमी झाली आहे. मात्र पावसामुळे हवेत गारठा जाणवत आहे.राज्यात सध्या पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. आज आणि उद्या कोकणात पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गात पावसाच्या हलक्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. तर सांगली आणि कोल्हापूरमध्येही पावसाची शक्यता आहे. धुळे, नंदुरबार, अहमदनगरमध्येही आज आणि उद्या हपाऊस होणार असल्याचे हवामान खात्याने म्हंटले आहे. पुणे, कोल्हापूर, नाशिक, आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये विजाच्या कडकडाटासह पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.राज्यात पुढील ४८ तासात काही ठिकाणी तुरळक पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर दुसरीकडे मुंबई उपनगरात सध्या ढगाळ वातावरण पाहायला मिळत असून थंडीचा कडाका कमी झाला आहे. मुंबईत सध्या किमान तापमानात किंचित वाढ झाली आहे. दरम्यान, मुंबईसह उपनगर आणि ठाणे, पालघरमध्ये पहाटे आणि रात्रीच्या वेळी हवेत गारठा जाणवत आहे, तर दुपारी उन्हाची झळ सोसावी लागत आहे.पुढील काही दिवसांमध्ये आणखी एक वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम महाराष्ट्रासह देशाच्या काही भागांवर होण्याची शक्यता आहे. यामुळे पावसाची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, यामुळे रात्रीच्या तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यातील किमान तापमानात सध्या वाढ झाली आहे, तर उत्तर भारतातील इतर भागांमध्ये रात्रीचे तापमान सामान्य आणि दिवसा अत्यंत थंड वातावरण जाणवत आहे.९ जानेवारीनंतर देशासह राज्यातील विविध भागात पावसाची शक्यता आहे. पाऊस पडल्याने धुक्यापासून दिलासा मिळण्याची शक्यता आहे. पुढील तीन दिवस अनेक राज्यात हवामान कोरडं राहील, तर काही भागात मेघगर्जनेसह पावसाची रिमझिम पाहायला मिळेल, असे हवामान विभागाने म्हटले आहे. त्यानंतर मात्र तापमानात घट होऊन गारठा वाढेल असा अंदाज आहे.



# पंचशील बौद्ध विहारात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील सालोरी येन्सा ब्लॉक मजरा ( लहान) येथील पंचशील बौद्ध विहारात स्त्री शिक्षणाची देवता, थोर समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जयघोष करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भगवान गौतम बुद्ध, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून बुद्ध वंदनेने करण्यात आली. व मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकत उपस्थितांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात बौद्ध पंचशील कमिटीचे माजी अध्यक्ष व ग्राम पंचायत सदस्या प्रतिभा मानकर, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते ग्यानीवंत गेडाम, सुरेंद्र खोब्रागडे, लालचंद पाटील,जेष्ठ कार्यकर्ते आबा रामटेके, सिद्धार्थ वानखेडे,वावरे, सुरेंद्र वावरे, दिक्षा धाबेकर, पंकज रामटेके, कैलास गेडाम, अनुराग गडेकर, उमरे, माया भरणे, रमा गेडाम, उज्वला गेडाम व गावातील सर्व बौद्ध उपासक –उपासिका, बौद्ध अनुयायी व गावातील नागरिक यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



# पत्रकार संघाच्या नूतन कार्यालयाचे लोकार्पण तथा सत्कार सोहळा आज

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुका पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनाचे औचित्य साधून नूतन कार्यालय लोकार्पण तथा मान्यवरांचा सत्कार सोहळा आज शनिवार दि ६ जानेवारी ला सायंकाळी ४ वाजता पत्रकार संघ कार्यालय, जुनी नगरपालिका येथे आयोजित केलेला आहे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रतिभा धानोरकर यांची उपस्थिती राहणार असून, वरोरा नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी गजानन भोयर, जिल्हा माहिती अधिकारी चंद्रपूर, राजेश येसनकर, वरोरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती जयंत टेंमुर्डे आणि माजी नगराध्यक्ष विलास टिपले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.या प्रसंगी पत्रकार पत्रकार संघाच्या नूतन कार्यालयाचा लोकार्पण सोहळा आयोजित





करण्यात आला असून वरोरा शहराच्या लौकिकात भर घालणारे आदित्य चंद्रभान जिवने ( आय ए एस ), सहाय्यक जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना वरोरा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पत्रकार संघाचे जेष्ठ सदस्य राजाभाऊ लोणारकर यांना जीवनगौरव तसेच वरोरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदी निवडून आलेले ज्येष्ठ पत्रकार बाळू भोयर यांचाही सत्कार याप्रसंगी आयोजित केलेला आहे.पत्रकार संघाचे सदर कार्यालय हे वरोरा तालुक्यातील सर्व पत्रकार संघटना, संस्था आणि सर्वसामान्य व्यक्तींना पत्रकार परिषदा घेण्याकरिता विनामूल्य उपलब्ध असणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली. कार्यक्रमाला अधिकाधिक संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन या प्रसंगी करण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेकरिता निवड झालेल्या योगपटूंचा आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते सन्मान



**वरोरा । प्रतिनिधी**

इरा इंटरनॅशनल स्कूल नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या ३५ व्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेत वरोरा येथील एस.ए योगा इन्टीट्यूटच्या ८ योगपटूंची बँकॉक (थायलंड) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेकरिता निवड झाली. यानिमित्त आमदार प्रतिभा धानोरकर यांनी या सर्व खेळाडूंचे वरोरा येथील जनसंपर्क कार्यालय येथे अभिनंदन केले. या स्पर्धेत १६ राज्यातील ४०० योगपटूनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा पारंपरिक योगा, रिदमीक योगा, आर्टिस्टिक योगा या तीन विभागांमध्ये घेण्यात आली होती. योगपटू शौनक आमटे १ सुवर्ण पदक, राम झाडे २ सुवर्ण पदक, साहिल खापणे १ कांस्य, श्रीकांत घानवडे उपविजेता, स्वर्णिका नौकरकर २ सुवर्ण पदक, सई नेवास्कर १ सुवर्ण, गायत्री पाल १ रौप्य पदक, शर्वरी मिटकरी उपविजेती तसेच महाराष्ट्र संघाने जास्तीत जास्त पदके मिळवून उच्चांक प्राप्त केला आहे. तसेच एसए योगा इन्टीट्यूटचे प्रशिक्षक तथा संस्थापक स्वप्नील पोहनकर, अनिकेत ठक यांच्या मार्गदर्शनाखाली विजेते सर्व योगपदक नियमित सरावाचे धडे घेत आहेत.ही स्पर्धा मार्च २०२४ मध्ये होणार असून, या यशाबद्दल आमदार प्रतिभा धानोरकर यांनी या सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. त्यांनी म्हटले की, वरोरा येथील एसए योगा इन्स्टिट्यूटचे योगपटू नेहमीच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यश संपादन करत आहेत. या यशामुळे वरोरा शहराचे नाव देशभरात उज्ज्वल झाले आहे. या योगपटूंचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.काही महिन्यांपूर्वी आमदार प्रतिभा धानोरकर यांच्याकडून वरोरा येथील एसए योगा इन्स्टिट्यूटच्या १५ योगपटूंना योग्य किट उपलब्ध करून देण्यात आले होते. त्या किटच्या फायदा या खेळाडूंना झाल्याने खेळाडूंनी देखील आमदार प्रतिभा धानोरकर यांचे विशेष आभार मानले.

# आनंदनिकेत महाविद्यालयाचे अठरा विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**वरोरा । प्रतिनिधी**

सन १९६४ ला आनंदनिकेतन महाविद्यालयाचे आर्ट्स,सायन्स, कॉमर्स सुरू झाले. सामाजिक सेवेचा वसा असणाऱ्या महाविद्यालयाने कायमच गुणवत्तापूर्वक शिक्षणाला प्राधान्य दिले.१९६४ पासून महाविद्यालयाने सांस्कृतिक सामाजिक तथा शैक्षणिक क्षेत्रात जी उंची गाठली होती ती आजही कायम ठेवली आहे.२०१६–१७ पासून आनंद निकेतन महाविद्यालयात एम.एस.सी सुरू करण्यात आले.विशेष म्हणजे तेव्हापासून सातत्याने एम.एस.सी च्या परीक्षेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी मेरिट लिस्ट मध्ये येत आहेत.अभिमानाची बाब म्हणजे सन २०२२–२३या वर्षातही महाविद्यालयाच्या अठरा विद्यार्थ्यांनी प्रामुख्याने

एम.एससी,एम.ए,बीकॉम व बी.एस्सी परीक्षांच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.यावर्षी अभिमानाची बाब म्हणजे एम.एससी रसायनशास्त्र या विषयात मेरिट लिस्ट मधले पहिले पाचही विद्यार्थी महाविद्यालयाचे आहेत.कु पुनम वा.बन ,कु.ममता राजू मजगवळी,कु.मृणाल नथुजी दडमल ,कु.श्रध्दा लक्ष्मण दुरूकर .कु.साक्षी नारायण धोबे यांनी अनुक्रमे पहिला,दुसरा, तिसरा,चौथा व पाचवा येण्याचा मान मिळवला. तसेच एम.एससी. वनस्पतीशास्त्र या विषयात कु.आलिशा जीतेंद्र सोरदे



,कु.राधिका सुभाष लोनगाडगे व कु. निशा दशरथ बोढे यांना पहिला ,तिसरा व पाचवा क्रमांक आला. एम.एससी.पदार्थविज्ञान या विषयात कु.आचल हिरामन नारंजे हि गुणवत्ता यादीत अनुक्रमे दुसरी आली ,कु सानियाजबिन शब्बीर शेख यांनीही एम.एससी प्राणीशास्त्र या विषयात चौथा येण्याचा मान मिळवला. एम.एस्सी गणीत या विषयात देखील कु.आचल माणिक धवले हिने विद्यापीठातून पहिला येण्याचा मान प्राप्त केला.२०२०–२१ या वर्षात महाविद्यालयात एम.ए. सुरु करण्यात आले.आणि या वर्षी एम.ए. राज्यशास्त्र या विषयात कु.ऊर्मीला साईनाथ पटनाला हिने तिसरा तर एम.ए. अर्थशास्त्र या विषयात कु.पल्लवी एकनाथ जिवतोडे व कु. हेमलता प्रदीप डाहुले यांनी अनुक्रमे प्रथम व तृतीय येण्याचा सन्मान प्राप्त केला. कु.समस्वी महेंद्र जिवतोडे व आदित्य प्रभाकर कडबे यांनी बी.एससी पदवीमधून आठवे व दहावे मेरिट स्थान मिळवले.विशेष बाब म्हणजे कु. रिती रवींद्र ढेंगुळे हिला बीएस्सी वनस्पतीशास्त्र या विषयात विद्यापीठातून सर्वात जास्त गुण मिळाले. महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे, आनंदवन विश्वस्त मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मृणाल काळे, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक वर्ग सर्वच जण विद्यार्थ्यांच्या या यशाचे कौतुक करत आहे.

# प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबीत समस्याने शिक्षकांत असंतोष

## महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समितीचा आंदोलनाचा इशारा

**मूल । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांच्या अनेक समस्या प्रलंबित आहेत . त्यासंबंधाने निवेदन देण्यात आले होते तसेच शिक्षक आमदार सुधाकर अडबाले ,विधान परिषद म.रा.मुंबई यांचे अध्यक्षतेखाली शिक्षकांच्या निवेदनातील समस्यांवर चर्चा करण्यात आली. सदर आढावा सभेत निवेदनातील नमुद सर्व समस्या निकाली काढण्याचे लेखी आश्वासन शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी दिले होते व तशी इतिवृत्तला नोंद घेण्यात आलेली आहे.मात्र प्रशासनाने संघटनेला संबंधित समस्यासंबंधाने कार्यपुर्ती अहवाल दिलेले नाही तसेच शिक्षकांच्या समस्या प्रलंबित असल्याने शिक्षकांमध्ये असंतोष पसरलेला आहे .प्रशासनाच्या दिरंगाईमुळे व ढिसाळ कारभारामुळे शिक्षकांच्या समस्या प्रलंबित आहेत परिणामी प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे नाईलाजास्तव महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेने जिल्हा परिषद समोर आंदोलन करण्याचे निश्चित केलेले आहे. डी.सी.पी.एस. धारक शिक्षकांचे खात्यातील तफावत दूर करणे.विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख, उच् श्रेणी मुख्याध्यापकांची रिक्त् पदे पदोन्नतीने भरण्यात यावी,एकस्तर वेतनश्रेणी वरिष्ठ कोर्ट केस मधील याचिकाकर्ते अंतिम निकालानुसार मंजुरी आदेश देणे.आदिवासी क्षेत्रात कार्यरत असलेल्या न्यायप्रविष्ट शिक्षकांचे एकस्तर वेतननिश्चिती करुन मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी काढलेल्या पत्रानुसार न्याय प्रदान करणे. शैक्षणिक अर्हता वाढीचे अधिकार पं.स.स्तरावर देणे.शैक्षणिक परवानगी आदेश देणे. मंजुर वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकांची मंजुरी आदेशानुसार यादी प्रकाशित करणे. मुळ सेवापुस्तक पडताळणीस होत असलेल्या विलंबासंबंधाने नियोजन करणे.स्थायी आदेश प्रस्ताव मंजुर करणे, वरिष्ठ वेतन श्रेणी मंजुरीसाठी नवीन प्रस्ताव मागविणे व तात्काळ मंजुरी प्रदान करणे. आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप् शिक्षकांना एक वेतनवाढ देणे, शिक्षक पुरस्कार प्राप् शिक्षकांचे सेवानिवृत्ती समयी अतिप्रदान म्हणुन केलेली वसुली परत करणे. सेवानिवृत् शिक्षकांची एकस्तर वेतनश्रेणी संबंधाने अतिप्रदान म्हणुन केलेली वसुलीची रक्कम परत करणे. नितीन विद्यासागर बमनवार पं.स.सावली यांचे जन्म् दिनांकात दुरुस्ती करण्याची मंजुरी देणे.रिक्त् असलेल्या विषय शिक्षक पदावर पदस्थापना करणे. निर्लेखित झालेल्या वर्गखोल्यांचे बांधकाम त्वरीत करुन देणे,संघटनेचे पदाधिकारी शिक्षकांच्या समस्या संदर्भात जि.प.ला चौकशीसाठी आले असतांना कार्यालयीन कर्मचा-यांनी संबंधितांना सन्मानपुर्वक सहकार्य करणे ,पदवी अर्हता धारण न केलेल्या विज्ञान विषय शिक्षकांना मुळ पदावर पदस्थापना न देता पदवी धारण करण्यास मुदतवाढ देण्यात यावी. संगणक वसुली न करणेबाबत. आदिवासी एकस्तर प्रोत्साहन भत्ता व एकस्तर वेतननिश्चितीची थकबाकी अदा करणे,इत्यादी समस्यांचे निवेदन शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना दिले असून समस्यांचे निवारण दिनांक ३१ जानेवारी २०२४ पर्यंत न झाल्यास दिनांक १ फेब्रुवारी २०२४ पासून जिल्हा परिषद समोर आंदोलन करण्यात येईल असे महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती चे राज्यनेते विजय भोगेकर, पुरोगामी महिला मंच राज्याध्यक्षा डॉ.अल्का ठाकरे, राज्यसरचिटणीस हरीश ससनकर, जिल्हानेते नारायण कांबळे,दिपक व-हेकर, जिल्हाध्यक्ष किशोर आनंदवार,जिल्हा सरचिटणीस सुरेश गिलोरकर,जिल्हाकार्याध्यक्ष गंगाधर बोढे, जिल्हाकोषाध्यक्ष सुनिल कोहपरे, पुरोगामी महिला मंच जिल्हाध्यक्ष विद्या खटी,पौर्णिमा मेहरकुरे व पुरोगामी चे पदाधिकारी यांनी इशारा दिला आहे असे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण खोब्रागडे यांनी कळविले आहे.

# भाकरीचा चंद्र आणि आरोग्य

**उत्तम शरीरयष्टी कमवायची असेल तर संतुलित आहार घ्यायला हवा. आरोग्याच्या दृष्टिकोनातून पाहिले तर ज्वारी आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. तांदूळ आणि गव्हाच्या तुलनेत पोषक आहार म्हणून तिला मान्यता मिळाली आहे. शहरी भागातील लोकांपेक्षा ग्रामीण भागातील लोक आजही मुख्य अन्न म्हणून ज्वारीलाच प्राधान्य देतात. म्हणून ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्याच्या तक्रारी कमी असतात. आहारात ज्वारीचा वापर केल्याने अनेक फायदे आहेत. आरोग्य उत्तम ठेवायचे असेल आणि निरोगी जगायचे असेल तर ज्वारीच्या भाकरीशिवाय पर्याय नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. ज्वारीची भाकरी म्हणजे रोजच्या आहारातील राजा आहे . कधीकाळी हेटाळणीचा विषय झालेल्या भाकरीला डॉक्टरांच्या सल्ल्याने शेवटी जवळ करावेच लागते. आनंदाने जगायचे असेल व आरोग्याची काळजी घेण्यासाठी भाकरी हाच मुख्य आहार असायला पाहिजे असे मनापासून पटते.**




आमच्या लहानपणी म्हणजे साधारणतः सत्तरीच्या दशकात ज्वारीची भाकरी हेच मुख्य जेवण होतं. घरोघरी मातीच्या चुलीवरील भाकरी हाच मुख्य आहार होता. त्याकाळी चाकरमानी मंडळी सोडली तर बहुतांश घरी ज्वारीची भाकरीच बनायची. विशेषतः ग्रामीण भागात ज्वारीच्या भाकरीशिवाय पर्याय नव्हता. सगळीकडे ज्वारीची भाकरी आणि कन्या हाच मुख्य आहार असे. रोज सकाळ संध्याकाळ ज्वारीची भाकरी आणि कन्या खाऊन जीवन कंटाळायचा . अपवादात्मक परिस्थितीत म्हणजे घरी पाहुणे मंडळी आली वा घरात कोणाचा उपवास असला किंवा सणासुदीच्या दिवशी गव्हाच्या पोळ्या आणि तांदळाचा भात शिजायचा. बाकी अन्य दिवशी येरे माझ्या मागल्या याप्रमाणे भाकर आणि कन्या मुख्य आहार होता. कुणाकडे पाहूनपणा गेलं तरच ही भाकरी चुकायची. शहरातील नोकरदार लोकांकडे होणाऱ्या पोळ्या आणि भात बघून (आपल्या घरच्या भाकरीबद्दल) मनात कुठेतरी आपण कमी आहोत असा न्युनगंड वाटायचा. आपल्या गरिबीची जाणीव व्हायची. गव्हाच्या पोळ्या खाणारी नोकरदार घरातील मुले किती भाग्यवान आहेत असे वाटायचे. त्यांना रोज रोज गव्हाच्या पोळ्या आणि तांदळाचा भात खायला मिळतो. आपल्यालाही असेच खायला मिळाले तर किती मजा येईल असे विचार मनामध्ये घोघावायचे. पण ते सगळे स्वप्नवत होते. पुढे नोकरी निमित्ताने शहरांमध्ये यावे लागले. शहरात कायमची आरामशीर व चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. आहारात बदल झाला. भाकरी आणि कन्यांची जागा पोळी आणि भाताने कधी घेतली कळलेच नाही. कधीकाळी बालपणी बघितलेले ते स्वप्न जरी पूर्ण झाले असले तरी आता जगण्यातील वास्तविकता कळली आहे. बालपणी नाराजी व्यक्त केलेल्या त्या भाकरीचे महत्व आता कळायला लागले आहे. आता या रोजरोजच्या पोळी आणि भाताने जीव कंटाळून गेला आहे. वाटते ते जुनेच दिवस बरे होते. काही आजारपणांच्या निमित्ताने डॉक्टरांनी भाकरी खाण्याचा दिलेला सल्ला आता पटायला लागला आहे. कदाचित ती भाकरी जर सोडली नसती तर आपल्याला व्याधीलाही पुढे जावे लागले नसते असे विचार मनात डोकावतात आणि भाकरीचे महत्व मनात घर करून बसते.

खुर्चीवर बसून काम करणाऱ्या शहरातील लोकांना विशेषतः कार्यालयीन कर्मचाऱ्यांना अनेक शारीरिक व्याधी झालेल्या दिसतात. तेव्हा डॉक्टर त्यांना निरोगी आरोग्यासाठी ज्वारीची भाकर आणि कन्या खाण्याचा सल्ला देतात. बालपणी जी भाकरी आणि कन्या खाऊनखाऊन जीव कंटाळायचा. पोळीचे नाविन्य वाटायचे. आता भाकरीचे नाविन्य वाटायला लागले आहे. शहरात ज्वारी डोळ्याने दिसतही नाही तिचे दर्शन दुर्लभ झाले आहे. बालपणी ज्या ज्वारीची सर्वत्र मुबलकता होती तिचे साधे दर्शनही दुर्मिळ झाल्याने आपोआपच बालपणातील ज्वारी अंतर्मनात घर करायला लागली आहे.

शरीराची गरज म्हणा किंवा आहारात दुर्मिळ झाली म्हणून म्हणा ज्वारीची भाकरी हवीहवीशी झाली आहे. ज्या भाकरीकडे पूर्वी तिरस्काराने बघितले जायचे तीच भाकरी आता सार्वजनिक जीवनात विशेषतः शहरात सन्मानाने प्रतिष्ठित झालेली आहे. अनेक सामूहिक समारंभात विशेषतः विवाह समारंभात भाकरीला मानसन्मान मिळत आहे. प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या पुरणपोळी सारख्या गोड पदार्थांच्या बाजूला मोठ्या डौलात ज्वारीची भाकरी आणि झुनका मांडलेले असते. आश्चर्य म्हणजे घरात पोळीकडे वळणारे हात अशा कार्यक्रमात भाकरी आणि झुनक्याकडे आवडीने वळतात. कारण घराघरांत गव्हाच्या पोळ्या सामान्य खाद्य झाले आहे. आता तर अशी वेळ आली की अनेकांना भाकरी करताही येत नाही. खेड्यातील सात/आठ वयातील मुलींना ज्या दिमाखात भाकरी तयार करता येतात. तशा भाकरी शहरातील चाळीशी पार केलेल्या गृहिणींनासुद्धा चांगल्याप्रकारे जमत नाही. खायची इच्छा तर आहे परंतु जमत नाही. म्हणून शहरी लोक अखेर हॉटेलचा सहारा घेतात. अलीकडे अनेकजण हॉटेलमध्ये भाकरींचा ऑर्डर देताना दिसतात. भाकरीची ऑर्डर ऐकून आमच्यासारख्या ग्रामीण भागात जीवन गेलेल्यांना मोठे नवल वाटते. आज भाकरी ही अनेकांच्या आवडीचा विषय झाली. अनेकांच्या प्रेमाचा विषय झाली त्याचे. खरच भाकरीला किती चांगले दिवस आले नाही का? असे म्हणतात की प्रत्येकाचे दिवस असतात. माणसाने निराश होऊ नये. जीवनात वाईट परिस्थिती आली म्हणून खजील होऊन जाऊ नये. प्रत्येकाच्या आयुष्यात एक ना एक दिवस चांगला दिवस येणारच. कधीकाळी भाकरी खाणारे म्हणून आम्ही हेटाळणीचा विषय होतो. आता तीच शहरी मंडळी आमच्या भाकरीजवळ मांडी मारून ती आवडीने खातात केवढा हा चमत्कार.

भाकरी आरोग्यासाठी उत्तम आहे. पचायला उत्तम आहे. अलिकडे डॉक्टर मंडळी आहारात ज्वारीच्या भाकरीचा वापर करायचा सल्ला देताना दिसत आहेत. लाल ज्वारी पौष्टिक आहे. ज्वारीच्या लाह्या खाल्ल्याने दाह कमी होतो. ज्वारीमध्ये मिनरल पोटॅशियम मॅग्नेशियमचे प्रमाण असते त्यामुळे ब्लड प्रेशर नियंत्रणात राहते. महिला वर्गातील मासिक पाळी आणि गर्भाशयाच्या समस्यांवरही ज्वारी उपायकारक आहे. ज्वारीमध्ये ब जीवनसत्व, मॅग्नेशियम, पोटॅशियम, फॉस्फरस, लोह आणि जस्त यासारखी जीवनसत्वे आणि खनिजे समृद्ध प्रमाणामध्ये आहे. हे फायबर अँटी-ऑक्सीडेंट्स आणि प्रथिनांचे उत्कृष्ट स्त्रोत देखील आहे. ज्वारीची भाकरी निमितपणे रोज कोणीही खाऊ शकतो. ती पचायला हलकी आहे. हे ग्लुटेनमुक्त धान्य असल्याने वजन कमी होते. रक्ताची साखळीची पातळी नियंत्रित राहते. कर्करोग प्रतिबंधित होते आणि हृदयाचे आरोग्य सुधारते. अशाप्रकारे ज्वारीचे अनेक फायदे आहेत.ज्वारी आरोग्यविषयक व फायदेशीर असल्याने अलीकडे अनेक शहरी लोक ज्वारीच्या आहाराकडे वळलेले आहे. कधीकाळी हेटाळणीचा विषय झालेली ही ज्वारीची भाकरी आता प्रतिष्ठित झाली आहे.सन्मानीत जागी विराजमान झालेली आहे. तिला मोठा मानसन्मान मिळत आहे. गव्हापेक्षा ज्वारीमध्ये आरोग्यदायक गुणधर्म असल्याने आता ती सर्वांच्या ताटामध्ये दिसायला लागली आहे.

# मंगरूळ (दत्त ) ते अयोध्या पायी यात्रा



संघाचे प्रचारक राहिलेले जेष्ठ प्रचारक ल. मा. देशपांडे मंगरूळ (दत्त )राहात होते. रामजन्मभूमी कारसेवा घोषणा झाल्यावर त्यांना स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. त्यांनी मंगरूळ ते अयोध्या पदयात्रा करण्याचा निश्चय केला. वय वर्षे ७० असताना पदयात्रेचा निर्णय घेणे, अलौकिकच दिव्यच होते. परंतु ल. मा. देशपांडे ठाम होते. अर्थात संघ स्वयंसेवकांच्या सहकार्याबद्दल विश्वास होताच. मंगरूळहुन पदयात्रा सुरु झाली. पहिला मुक्काम पुलगावला झाला. ल. मा. च दणक्यात स्वागत झालं. पुढला पाडाव दहेगाव ला ठरला. पुलगावहुन मी अविनाश भोपे, विजयराव निवल व बालकृष्ण तिवारी असे आम्ही सोबत पायी निघालो. श्रीराम राम जय राम जय जय राम चा गजर करत निघालो तर पायी चालणे काहीच वाटतं नव्हते. मार्गात कवठा, मलकापूर, दहेगाव (गावंडे )येथे स्वागत व रामजन्मभूमी कारसेवा भाग घेण्यासाठी उदबोधन झाले. मार्गात बालकृष्ण म्हणाला माझी पण अयोध्येला जायची इच्छा होत आहे. केशवनगरहुन वर्धेला पदयात्रा पोहोचणार होती. विजयराव व मी बालूला तु वर्धेपर्यंत जा. नंतर निर्णय घे. असा सल्ला दिला. त्यानंतर सुद्धा इच्छा असल्यास श्रीराम इच्छा समजून वाटचाल कर. वर्धेला पोहोचल्यावर बालुचा नित्य साहित्य व कपडे पाठवा, म्हणून निरोप आला. बालकृष्ण तिवारी ने जेष्ठ प्रचारक ल. मा. देशपांडे यांच्या बरोबर पायी जाण्याचा निर्णय घेतला व तो पुर्ण केला. दोघांचाही पदयात्रा कार्यक्रम अयोध्या रामजन्मभूमी आंदोलनातील महत्वपूर्ण अध्याय आहे. त्यानंतर जवळपास वर्षभर ते अयोध्येत राहिले. दोन्ही कारसेवा मध्ये त्यांचा सहभाग होता.बाळकृष्ण तिवारी यांचा लहान भाऊ कमल तिवारी ढाच्या पडतेवेळी घुमटावर होता. तो जखमी झाला. अनेक दिवस फैझाबाद रुग्णालयात उपचार घेत होता. तरुण भारत चे पुलगाव तालुका प्रतिनिधी व भाजपा तसेच विश्व हिंदू परिषदेच्या विविध दायित्व पार पाडलेले बद्रीनारायणजी तिवारी यांची बाळकृष्ण व कमल ही मुले होती. बद्रीनारायणजी रामजन्मभूमी आंदोलनाच्या वेळी पुर्णवेळ प्रवास करीत होते.वयाच्या ७० व्या वर्षी मंगरूळ ते अयोध्या पदयात्रा करणारे धन्य ते ल. मा. देशपांडे!

संघ परिवाराच्या कार्याला झोकून देणारा धन्य तो तिवारी परिवार!

**अविनाश भोपे, पुलगाव**

# एकार्जुना येथे २५ हेक्टरवर उभे राहणार उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन केंद्र

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून कृषी विकासाला चालना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात भाजीपाला पिकांची उत्पादकता, गुणवत्ता, बिजोत्पादन, काढणी पश्चात तंत्रज्ञान आदी विषयांवर संशोधन व्हावे, एवढेच नव्हे तर विदर्भातील भाजीपाला पिकासंदर्भात सुधारीत तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने, राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातून एकार्जुना (ता. वरोरा) येथे उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन केंद्र उभे राहत आहे.

कापूस उत्पादन संशोधन केंद्राप्रमाणेच जिल्ह्यात भाजीपाला संशोधन केंद्र असावे, असा विचार एक महिन्यापूर्वी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केला. याबाबत मुनगंटीवार यांनी राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे मागणी केली. ना.मुनगंटीवार यांच्या मागणीला अल्पावधीतच कृषी मंत्री मुंडे यांनी मान्यता देऊन याबाबतचा आदेश जिल्हा कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी (दि.३ जानेवारी) पालकमंत्री मुनगंटीवार यांच्याकडे सुपूर्द केला. त्यामुळे आता एकार्जुना येथे २५ हेक्टर जागेवर ३१ कोटी ९० लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात येणा-या भाजीपाला संशोधन केंद्राचा मार्ग मोकळा झाला आहे.

भारत हा भाजीपाला उत्पादनात चीन नंतर जगात दुस-या क्रमांकावर आहे. जगात घेतल्या जाणा-या एकूण भाजीपाला उत्पादनाच्या १५ टक्के भाजीपाला उत्पादन भारतात होते. भाजीपाला उत्पादनासाठी लागणारा कमी कालावधी, जास्त उत्पादन, भरपूर प्रमाणात उपलब्ध असणारी आहार पोषण मुल्य व शेती क्षेत्रात आणि शेती बाहेरील क्षेत्रात रोजगार उपलब्ध करून देण्याची क्षमता यामुळे भाजीपाला हा महत्वाचा घटक मानला जातो. भारतीय वैद्यकीय अनुसंधान परिषदेच्या निकषानुसार प्रति व्यक्ती प्रति दिन ३०० ग्रॅम भाजीपाला आहारात घेणे आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्षात प्रतिव्यक्ती ऐवढा भाजीपाला आपल्या देशात उपलब्ध नाही. भाजीपाल्याची अयोग्य काढणी, हाताळणी आणि टिकविण्याच्या अपु-या सुविधेमुळे उत्पादीत भाजीपाल्याचे जवळपास ३० ते ४० टक्के नुकसान होते.

**जिल्ह्यात भाजीपाला लागवडीस मोठा वाव :**

विदर्भातील अनुकूल हवामान व जमीन यामुळे बहुतेक सर्वच भाजीपाला पिकांची लागवड केली जाते. चंद्रपूर जिल्ह्यात प्रामुख्याने मिरची, हळद, वांगी, टोमॅटो, कांदा, फुलकोबी, पत्ताकोबी, मुळा इत्यादी भाजीपाल्याची पिके घेतली जातात. चंद्रपूर जिल्ह्यात प्रमुख भाजीपाला



पिकाखाली एकूण २४३२ हेक्टर क्षेत्र असून त्यापासून १७८०२ मेट्रीक टन उत्पादन होते. जिल्ह्यातील लागवडीखालील जमीन मुख्यत: खोल गर्दकाळी (५६.६० टक्के), उमळ काळी जमीन (२५.५ टक्के), मध्यम गर्द काळी जमीन (१०.५ टक्के) असून पर्जन्यमान ११०० ते १५०० मि.मी. आहे. भाजीपाला पिकाच्या लागवडीसाठी जिल्ह्यात उपयुक्त जमीन, मुबलक पाणी व मजुरांची उपलबधता असल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात भाजीपाला लागवडीस मोठा वाव आहे.

**भाजीपाला संशोधन केंद्राचा उद्देश :**

भाजीपाला पिकात अनुवंश शास्त्राचा अभ्यास करून सुधारीत / संकरीत वाण विकसीत करणे व गुणवत्तापूर्ण उत्पादनास चालना देणे. भाजीपाला पिकांच्या देशी वाणांचे संवर्धन करणे आणि या पिकांच्या लागवडीस चालना देणे. दुर्मिळ अशा रानभाज्यांचे संवर्धन व लागवड करणे. भाजीपाला पिकांचे लागवड तंत्रज्ञान विकसीत करून गुणवत्तापूर्वक उत्पादन वाढविणे. पिकांच्या दर्जेदार उत्पादनासाठी ठिबक सिंचन, फर्टिगेशन इत्यादी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करणे. भाजीपाला पिकांचे रोपवाटिका व्यवस्थापन व सुधारीत तंत्रज्ञान विकसीत करणे. बिजोत्पादन तंत्रज्ञान विकसीत करणे. संरक्षित भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान विकसीत करणे. भाजीपाला पिकांवर येणा-या किडी व रोगांचा अभ्यास करून त्यावर नियंत्रणाचे प्रभावी उपाय शोधणे. भाजीपाला पिकांची प्रक्रिया, मुल्यवर्धन आणि साठवणूक यावर संशोधन करणे. मुल्यवर्धन करून त्यावर आधारीत प्रक्रिया उद्योगास चालना देणे. भाजीपाला पिकांच्या सुधारीत लागवड तंत्रज्ञानाचे शेतक-यांना प्रशिक्षण देणे. सेंद्रीय भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञानाचे संशोधन आणि प्रात्यक्षिक करणे. जैविक आणि अजैविक तणाव कमी करण्यासाठी तंत्राचे मानकीकरण तसेच विदर्भातील भाजीपाला पिकांच्या विविध बाबींवर संशोधन करून आलेल्या निष्कर्षाबाबत शेतक-यांना अवगत करणे.

# पत्रकार संघाच्या वतीने आज दर्पणकार पुरस्काराचे मान्यवरांच्या शुभहस्ते शानदार वितरण होणार

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा बीडच्या वतीने दर्पण दिना निमित्त आज शनिवार दिनांक ६ जानेवारी रोजी स.मा.गर्गे भवन येथे मान्यवरांच्या शुभहस्ते बाळशास्त्री जांभेकर बीडचे दर्पणकार या पुरस्कार सोहळ्याचे शानदार वितरण होणार आहे. या पुरस्कार सोहळयास पत्रकारांसह पत्रकार प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली, पत्रकार संघाचे मार्गदर्शक संतोष मानूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज शनिवार दिनांक ६ जानेवारी २०२४ रोजी बीड येथील स.मा.गर्गे भवन, तुळजाई चौक, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या पाठीमागे,बीड येथे सकाळी ११ वाजता बाळशास्त्री जांभेकर दर्पण दिन साजरा करण्यात येणार आहे.

दर्पण दिनानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी बाळशास्त्री जांभेकर बीडचे दर्पणकार या नामांकित पुरस्काराने यावर्षी बीडचे भूषण म्हणून पश्चिम भारताचे पीटीआय प्रमुख विलास तोकले, मराठी दर्पणकार म्हणून सुराज्यचे संपादक सर्वोत्तम गावस्कर, उर्दू दर्पणकार दैनिक तामिरचे संपादक मकदूम काझी, इंग्रजी दर्पणकार म्हणून लोकमत टाइम्सचे जिल्हा प्रतिनिधी सी आर पटेल, हिंदी दर्पणकार दैनिक लोकमतचे उपसंपादक अनिल भंडारी, इलेक्ट्रॉनिक मीडिया दर्पणकार म्हणून टीव्ही ९ चे महेंद्र मुधोळकर, न्यूजपोर्टल सोशल मीडिया दर्पणकार संग्राम धनवे, युट्युब सोशल मीडिया दर्पणकार संतोष ढाकणे आणि अब्दुल कलाम वैचारिक दूत पुरस्काराचे मानकरी आष्टी येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते भीमराव गुरव या पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे बीडचे आमदार संदीप क्षीरसागर,निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, एसडीओ कश्मिरा नायर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर अशोक बडे या मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या शानदार पुरस्कार सोहळ्यास आणि दर्पण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास पत्रकार संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधव,भगिनी, पत्रकार प्रेमी नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांनी केले आहे.

### या मान्यवरांच्या शुभहस्ते होणार पुरस्काराचे वितरण

**पुरस्कार प्राप्त पत्रकार यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ सन्मानपत्र सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात येणार आहे हा सन्मान आमदार संदीप क्षीरसागर, निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, एसडीओ कश्मीरा नायर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अशोक बडे या मान्यवरांच्या उपस्थितीत होणार पुरस्कार वितरण सोहळा.**

# गोंडवाना विद्यापीठाच्या जनसंवाद विभागाच्या वतीने एकदिवसीय व्याख्यानाचे आयोजन




**गडचिरोली :** मराठी पत्रकार दिनाच्या निमित्ताने उद्या शनिवारी ६ जानेवारीला, सकाळी ११ वाजता. गोंडवाना विद्यापीठाच्या जनसंवाद विभागाच्या वतीने 'मराठी पत्रकारितेचे योगदान आणि आव्हाने' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून तरुण भारत वृत्तपत्राच्या डिजिटल आवृत्तीचे जेष्ठ संपादक, साहित्यिक आणि लेखक शैलेश पांडे उपस्थित राहणार आहेत. तसेच अध्यक्षस्थानी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे राहणार असून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे , कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन जनसंवाद विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अपर जिल्हाधिकाऱ्यांनी उघडकीस आणलेले रेती चोरी प्रकरण थंडबस्त्यात

**गडचिरोली । प्रतिनिधी**

भामरागडजवळच्या त्रिवेणी संगमावजवळच्या नदीपात्रातून बिनबोभाटपणे सुरू असलेली रेतीची चोरी चार दिवसांपूर्वी अहेरीचे अपर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी त्यांच्या दौऱ्यात उघडकीस आणली होती. घाटावरून किती रेतीची चोरी झाली याचे मोजमाप करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी कनिष्ठ अधिकाऱ्यांना दिले होते. पण रेती चोरट्यांचा शोध किंवा दंडात्मक कारवाई तर दूर, अद्याप घाटावरील रेतीची मोजणीही झालेली नाही. त्यामुळे भामरागड तालुक्यात महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी, वनविभाग आणि रेती चोरटे यांचे संगनमत तर नाही ना, अशी शंका व्यक्त केली जात आहे.रेतीघाटांचा लिलाव न झाल्याने सध्या रेती तस्करांकडून अनेक ठिकाणच्या घाटांवरून रेतीची लूट केली जात आहे. अहेरीचे अपर जिल्हाधिकारी विजय भाकरे गेल्या आठवड्यात भामरागड तालुक्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी आपला मोर्चा पर्लकोटा, पामुलगौतम आणि इंद्रावती या तीन नद्यांचा संगम असलेल्या ठिकाणाकडे वळविला. यावेळी तेथून सुरू असलेला रेती चोरीचा प्रकार त्यांनी उघडकीस आणला. त्यामुळे लगेच जेसीबी बोलवून नदीपात्रात वाहनांना जाण्या-येण्यासाठी तयार केलेला रस्ताही खोदून काढण्यात आला. यावेळी त्यांनी तस्करांनी आतापर्यंत किती रेती चोरून नेली याची चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश तहसीलदार प्रकाश पुप्पलवार यांना दिले. परंतू पाच दिवसानंतर अद्याप नदीपात्रातील रेती चोरीची तपासणी झालेली नाही.यासंदर्भात तहसीलदार पुप्पलवार यांना विचारले असता



रेतीघाटाच्या तपासणीसाठी भूमिअभिलेख अधीक्षकांना पत्र दिले असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय पोलिसातही रेती चोरीची चौकशी करण्यासंदर्भात तक्रार दिल्याचे सांगितले. पण आतापर्यंत ना मोजमाप झाले, ना अज्ञात रेती चोरट्यांवर गुन्हा दाखल झाला.भामरागडला लागून असलेल्या त्या रेती चोरीच्या ठिकाणावरून रेती काढली जात असताना संबंधित तलाठी किंवा मंडळ अधिकाऱ्याला याची कल्पना नसणे शक्य नाही. मात्र त्यांच्यावरही अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही. वनविभागाच्या जागेतून रस्ता बनविलेला असताना याची दखल घेण्याची गरज वनविभागाच्याही अधिकाऱ्यांना वाटली नाही. तहसीलदारांनी पोलिसात दिलेली तक्रारही केवळ एक औपचारिकताच होती. त्या तक्रारीत किती रुपयांच्या रेतीची चोरी झाली, कोणते वाहन जप्त केले का, किंवा कोणत्या संशयिताचे नाव, असे काहीही नमुद केलेले नाही. त्यामुळे त्या मोघम तक्रारीच्या आधारे आम्ही काय चौकशी करणार? असा सवाल भामरागड ठाण्याचे प्रभारी अधिकारी एपीआय शरद मेश्राम यांनी केला. त्यामुळे या प्रकरणात महसूल आणि वनविभागाची भूमिका संशयास्पद ठरत आहे. अशा स्थितीत हे प्रकरण थंडबस्त्यात पडते की काय, अशी शंका उपस्थित केली जात आहे.

# बेबस विदर्भाच्या मातीतील कळवंतांचा चित्रपट,१२जानेवारीला सिनेमागृहात

**मूल । प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र चर्चेत असलेलं कृपाल लंजे लिखित,निर्मित आणि दिग्दर्शीत बेबस हिंदी चित्रपट येत्या १२ जानेवारी २०२४ पासुन विदर्भातील आठ सिनेमा हॉल,ज्या मध्ये जयश्री टॉकीज नागपूर, राजकला टॉकीज चंद्रपूर, प्रभात टॉकीज गोंदिया, महावीर टॉकीज साकोली, स्नेहल टॉकीज तिरोडा, गोल्ड सिने मॅक्स टॉकीज ब्रम्हपुरी, सत्यम टॉकीज गडचिरोली,मा.सा. कन्नमवार हॉल मूल मध्ये प्रदर्शित होणार असुन,हा चित्रपट विदर्भाच्या माती मध्ये विदर्भातील प्रतिभावंत कलाकारांना घेऊन तयार करण्यात आलेला आहे.




प्रतिभा किंवा कलागुण हे मोठया शहराची मक्तेदारी नाही, एखादा उत्कृष्ट कलाकार हा छोट्या शहरात किंवा खेळ्यात एखादया गरीब कुटुंबात सुध्दा जन्माला येऊ शकतो फक्त गरज आहे त्यांच्या डोक्यावर विश्वासाने हात ठेऊन फक्त लढ म्हणायची,या चित्रपटात सर्व जातीच्या,धर्माच्या लोकांनी भुमिका केली आहे.आज आपण बघतो की सिनेमा म्हटल तर मुंबई - पुणे येथील निर्मात्यांची मक्तेदारी झाली आहे, आणि खर म्हटल तर त्यात चकित होण्यासारखं पण नाही कारण सिनेमा म्हटल की चंदेरी दुनिया आणि त्या साठी लागतो बक्कड पैसा,पण खरंच पैसाच सर्वत्र महत्वाचा आहे का तर नाही, या चित्रपटात १५० हून अधिक लोकांनी सहकार्याची भूमिका ठेऊन जे काम त्यांना सोपवीले ते काम पूर्ण केलेत आणि बेबस नावाचा हिंदी चित्रपट तयार केला. एका साकोली तालुक्यातील पिंडकेपार सारख्या छोट्याशा खेळ्यात,गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेला कृपाल लंजे सिनेमा बनवायचं स्वप्न बघतो आणि स्वहिमतीवर सहकार्याची भूमिका घेऊन ते स्वप्न पुर्ण करतो,यात सर्वांनी पुढाकार घेतला तर चित्रपट यशस्वी होईलच पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे भाविष्यात एखादया शेतकऱ्याचा मुलगा, एखादया मजुराचा मुलगा, एखादा कटिंग सलून चालवणारा, एखादा ड्रायव्हर,एखादा सेक्युरीटी गार्ड, एखादा पान टपरी चालवणारा किंवा एखादी गरीब कुटुंबातील मुलगी किंवा स्त्री हे स्वप्न बघू शकते की त्यांच्या किंवा शेजारच्या घरात असलेल्या टी. व्ही. वर त्यांनी केलेला सिनेमा प्रदर्शित होऊ शकतो आणि सार जग त्यांच्या कलेचं कौतुक करू शकतो,गरज आहे ती फक्त वातावरण निर्मितीची, संधीची, आणि त्यांच्या कलेला फुंकर घालण्याची.या चित्रपटात तुम्हाला आशुतोष सादमवार,ममता गोंगले,सचिन गेडाम ,संतोष कुमार,सुनील कुकुडकर,नीलेश जंपलवार,प्रफुल येलचलवार,रितेश चौधरी, नयना खोब्रागडे, माही देशवाल,करिष्मा मेश्राम,अविनाश पाटील, मयूर राशेट्टीवार,भास्कर पिंपळे,अमोल गेडाम ,मिष्टी बोलिवार,अनिरुद्र सादमवार, विनोद बोलिवार , आकाश आरेवार,सोनू भांडे , लेखराम हुलके,अमित पिपरे,रुपाली राऊत,प्रणित नमुलवार,क्रीष्णा सुरमवार,संदिप मोहबे,अनिल उईके , प्रभाकर भोयर,चैतन्य भोयर,शालिनि सुटे,सोनू म्हस्के,अमर नक्षिणे, देवीका मडावी,ऋतुजा उराडे, अंकिता चर्लावार, वर्षा संगीडवार, अमोल अकालूरवार,आकाश आरेवार,सुभाष माकडे, सुभाष गेडाम,प्रियदर्शन मडावी,मंजुषा चुधरी,विनत्रा आत्राम,संदिप जुलमे आणि अन्य १५० कलाकारांच्या कलेची उत्तम मेजवानी पहायला मिळणार आहे.या चित्रपटाच संगीत संतोष कुमार यांनी लिहिले असुन संगीत बद्ध केल आहे भास्कर पिंपळे यांनी,चित्रपटाचे गीत अंकीता टाकले आणि रुपाली राऊत यांनी गायले तसेच या चित्रपटाचे छायाचित्र संचालन धर्मेश कावळे यांनी केले व मुख्य संपादक म्हणुन सिद्धार्थ राऊत यांनी भूमीका पार पाडली.

# ज्येष्ठ नगरसेवक नरसिंह नाईकवाडे माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर गटात



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील ज्येष्ठ नगरसेवक नरसिंह नाईकवाडे आणि त्यांच्या मुलांनी गुरुवारी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या गटात जाहीर प्रवेश केला आहे. माजी मंत्री क्षीरसागर यांनी सर्वांचे स्वागत केले. माजीमंत्री क्षीरसागर यांच्या बरोबर राहून पुढील वाटचाल करणार असल्याचे नाईकवाडे म्हणाले.

बीड शहरातील ज्येष्ठ नगरसेवक म्हणून ओळखले जाणारे नरसिंह नाईकवाडे तसेच राष्ट्रवादी युवा काँग्रेसचे उपजिल्हाप्रमुख शैलेश नाईकवाडे, राहूल नाईकवाडे, अजय नाईकवाडे, यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या गटात प्रवेश केला आहे. १९९३-९४ पासून सक्रिय राजकारणात असलेले नरसिंह नाईकवाडे तीन वेळा स्वतः नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहेत तर दोन वेळा त्यांच्या पत्नी सुशिला नाईकवाडे नगरसेविका म्हणून प्रभाग क्रमांक २३ मधून निवडून आले आहेत, बीडच्या राजकारणात ज्येष्ठ आणि हजारो मतदार पाठीशी असणारे ज्येष्ठ नगरसेवक म्हणून त्यांची ओळख आहे. यापूर्वीही ते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याबरोबरच काम करत होते, मात्र मध्यंतराच्या काळात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. मात्र आज माजी मंत्री क्षीरसागर हेच आपले नेतृत्व असून त्यांच्याबरोबरच आपण काम करणार असल्याचे सांगत त्यांनी बशीरगंज येथील कार्यालयात जाहीर प्रवेश केला आहे . यावेळी नगरसेवक मुखींद लाला, शेख जमील भाई, वाजेद कुरेशी, शिवाजी जाधव, मोईन मौलाना, नाना मस्के, प्रवीण सुरवसे, अॅड. शेख खाजा, संतोष पवार, सुलेमान पठाण, पठाण, नवाज खान, शेख इम्रान आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचे हित जोपासणारी कृषी प्रदर्शनी-खासदार अशोक नेते

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी चांदा अँग्रो २०२४ कृषी महोत्सव,पशु प्रदर्शनी, चर्चासत्रे,बचतगट व दालने अशा विविध भव्य कृषी प्रदर्शनीचे आयोजन कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा ( आत्मा) कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, चंद्रपूर महाराष्ट्र शासन यांच्या वतीने चांदा क्लब मैदान चंद्रपूर या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.चांदा अँग्रो भव्य कृषी प्रदर्शनी या महोत्सवाला खासदार अशोक नेते उपस्थितीत राहुन मार्गदर्शन करतांना शेतकऱ्यांच्या हितासाठी, शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी,कृषी महोत्सव प्रदर्शनी च्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन,परिचर्चा व परिसंवाद मिळते.यासाठी अशा प्रदर्शनीचे आयोजन करणे गरजेचे आहे.केंद्र व राज्य शासन कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतलेले आहेत. कृषी क्षेत्राच्या विकासाठी देशाचे



पंतप्रधान मान.नरेंद्र मोदी जी यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे योग्य निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी विविध योजना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, सौर कृषी पंप योजना, कृषी अभियांत्रिकीकरण, राष्ट्रीय कृषी विकास योजना,प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, किसान क्रेडिट कार्ड ,मागेल त्याला शेततळे, मागेल त्याला विहीर अशा विविध योजना केंद्र शासनाने कार्यान्वित करून अमलांत आणले आहेत.अशा भव्य कृषी प्रदर्शनीच या ठिकाणी आयोजन केलं नक्कीच याचा फायदा शेतकऱ्यांना होईल. या कृषी प्रदर्शनीचा लाभ संपूर्ण शेतकऱ्यांनी घ्यावा.असे आवाहन याप्रसंगी खासदार अशोक नेते यांनी केले.यावेळी या प्रदर्शनीत कृषी विभागाचे अधिकारी यांनी खासदार अशोक नेते यांचे पुष्पगुच्छ,शाल श्रीफळ,सन्मान चिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.याप्रसंगी ओबीसी मोर्चा चे जिल्हाध्यक्ष अविनाश पाल, जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, कृषी अधिकारी वर्ग, तसेच मोठ्या संख्येने प्रदर्शनी ला शेतकरी बांधव उपस्थित होते..

# राज्याच्या पोलीस महासंचालकपदी रश्मी शुक्ला यांची नियुक्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

फोन टॅपिंग प्रकरणात वादग्रस्त ठरलेल्या भारतीय पोलीस सेवा (आय पी एस ) अधिकारी रश्मी शुक्ला यांची अखेर पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतची माहिती याआधीच म्हणजेच ३० डिसेंबर रोजी समोर आली होती. परंतु, याबाबतचा अधिकृत शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

राज्याच्या पोलीस महासंचालक पदाची जबाबदारी ही रजनीश शेठ यांच्याकडे होती. मात्र, ते ३१ डिसेंबरला सेवानिवृत्त झाले आहेत. पण निवृत्त होताच शेठ यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे नवे अध्यक्ष करण्यात आले. ज्यानंतर या पोलीस दलाची संपूर्ण जबाबदारी आता पहिल्यांदा एका महिलेकडे देण्यात आली आहे.या शासन निर्णयानंतर आय पी एस अधिकारी रश्मी शुक्ला या राज्यातील पहिल्या महिला पोलीस महासंचालक ठरल्या आहेत. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानावर मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यात बैठक झाली. या बैठकीत रश्मी शुक्लांना महासंचालक करण्याचा निर्णय घेण्यात आला.रश्मी शुक्लांची २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या काळातील कथित फोन टॅपिंग प्रकरणी महाविकास आघाडी सरकारने चौकशी सुरू केली होती. एकनाथ खडसे, संजय राऊत, नाना पटोले, आशिष देशमुख आणि बच्चू कडू यांचे फोन टॅप करण्यात आल्याची माहिती तत्कालीन गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी विधानसभेत देखील केली होती. त्या दरम्यानच्या काळात रश्मी शुक्ला या प्रतिनियुक्तीवर सी आर पी एफ मध्ये रुजू झाल्या होत्या.राज्यात सत्तांतर झाल्यानंतर फोन टॅपिंगच्या प्रकरणातील त्यांच्या विरोधातील चौकशी बंद झाली होती. मुंबई हायकोर्टाने रश्मी शुक्लांच्या विरोधातील फोन टॅपिंग प्रकरणातील याचिका फेटाळून लावल्या होत्या. राज्यात एकनाथ शिंदे यांचं सरकार आल्यानंतर रश्मी शुक्ला यांनी नवी दिल्लीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट देखील घेतली होती. ज्यानंतर या प्रकरणात सीबीआयने केलेल्या चौकशीत काहीही आढळून न आल्याने त्यांना महायुतीचे सरकार येताच क्लीन चीट देण्यात आली होती.

# ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपुरात झाला विश्वविक्रम!

## आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शेफ विष्णू मनोहर यांनी बनवली ७ हजार किलोपेक्षा अधिक खिचडी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी चंद्रपुरात आज सात हजार किलोपेक्षा जास्त तृणधान्यांची खिचडी बनवून विश्वविक्रम नोंदविला. महाराष्ट्राचे वने, सांस्कृतिक आणि मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूर येथील चांदा क्लब ग्राउंड येथे सुरू असलेल्या चांदा ग्रो २०२४ या भव्य कृषी प्रदर्शनात हा विक्रम नोंदविण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार साजरे करण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय मिलेट वर्षानिमित्त ना. मुनगंटीवार यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे विष्णू मनोहर यांनी चंद्रपूर येथे मिलेट खिचडी बनवून संपूर्ण जगाला मिलेटचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. ४ जानेवारीला रात्री एक महाकाय कढई नागपूरहून चंद्रपूर येथे आणण्यात आली, जी क्रेन द्वारे मैदानात उतरविण्यात आली. याबाबत चंद्रपुरकरांमध्ये कमालीची उत्सुकता बघायला मिळाली. पहाटे ६ वाजता विक्रमी खिचडी बनविण्यास सुरुवात झाली. ६ हजार ७५० किलो खिचडी बनविण्याचा संकल्प विष्णू मनोहर यांनी केला होता. विविध विभागातील कर्मचारी, भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते यावेळी स्वयंसेवक म्हणून उत्स्फूर्तपणे मदत करीत होते. ही खिचडी बनवण्याची पद्धत रेसिपी आणि मोठमोठ्या कढयांमधून टाकण्यात येणारे पदार्थ याबाबत सर्वच उपस्थितांमध्ये उत्साह दिसून आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२३ 'मिलेट वर्ष' म्हणून घोषित केल्यानंतर विष्णू मनोहर यांनी मिलेटच्या प्रचार व प्रसारासाठी वर्षभर वेगवेगळ्या शहरात १२ मिलेट्सचे पदार्थ तयार करण्याचा निर्धार केला होता. त्यानुसार आतापर्यंत नागपूर, औरंगाबाद व नाशिक येथे त्यांनी मिलेटचे विविध पदार्थ तयार केले आहेत. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून आयोजित चांदा ग्रो २०२४ मध्ये शेफ विष्णू मनोहर यांनी शुक्रवारी बाजरी हे मिलेट धान्य व सर्व भाज्यांचा वापर करून पूर्णान्न असलेली खिचडी तयार केली. त्यासाठी ते १० फूट व्यासाची, ५ फूट कढई, सुमारे ५०० किलो लाकूड वापरण्यात आले.विष्णू मनोहर यांनी याआधी दिल्ली येथे ५ हजार किलोची 'समरसता खिचडी' तयार केली आहे. नागपुरातील महाल भागात खिचडीला राष्ट्रीय अन्न घोषित करावे या मागणीसाठी ५



हजार किलोची खिचडी तयार केली होती. वनवासी कल्याण आश्रमाच्या डिलिस्टींग कार्यक्रमासाठी त्यांनी १० हजार किलो मसालेभात व नागपुरातील खासदार सांस्कृतिक महोत्सवात विष्णू मनोहर यांनी श्री गजानन महाराजांना ६ हजार ५०० किलो खिचडीचा नैवेद्य अर्पण केला होता.चांदा ग्रो २०२४ मध्ये करण्यात आलेला विक्रम महाराष्ट्रातील बळीराजाला समर्पित करण्याचा निर्धार यावेळी विष्णू मनोहर यांनी व्यक्त केला. पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी ही संधी दिल्याबद्दल मनोहर यांनी त्यांचे आभारही मानले. राज्याचे कृषी विभागाचे प्रधान सचिव श्री अनुप कुमार यांच्या हस्ते विष्णू मनोहर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा कृषी अधिकारी शंकर तोटावार, आत्माच्या प्रकल्प अधिकारी प्रीती हिरळकर, भाजपाचे महानगर अध्यक्ष राहुल पावडे, प्रकाश धारणे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्तश्री विपिन पालीवाल यांनी देखील ही खिचडी बनवताना विष्णू मनोहर यांच्या सोबत संवाद साधून उत्सुकतेने सर्व माहिती घेतली. ७ हजा किलोपेक्षा जास्त झालेली या खिचडीचे वाटप कसे करावे हा प्रश्न सर्वांनाच उत्सुकतेपटी पडलेला होता. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन आणि चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त विपिन पालीवाल यांनी संपूर्ण यंत्रणा शिस्तबद्ध रीतीने कामाला लावली व खिचडी शाळांमध्ये तसेच शहरातील वस्त्यांमध्ये वाटण्याची व्यवस्था केली. कृषी प्रदर्शनाच्या स्थळी सुद्धा विविध स्टॉल लावून आलेल्या प्रत्येकाला खिचडी देण्यात आली. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी यावेळी स्वयंसेवक म्हणून अथक परिश्रम घेतले. शहरातील ३५ हजार लोकांपर्यंत ही खिचडी पोहोचेल अशी व्यवस्था यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली होती. पूर्व नियोजित कार्यक्रमामुळे ना. सुधीर मुनगंटीवार हे नागपूरला असल्याने त्यांनी फोनवरून विष्णू मनोहर यांना शुभेच्छा दिल्या आणि चंद्रपुरात हा विश्वविक्रम केल्याबद्दल त्यांचेआभारमानले.

# जळगाव (जामोद) येथे अ.भा.ग्रामीण पत्रकार संघाचे एक दिवसीय खुले राज्यस्तरीय अधिवेशन

## सकारात्मक पत्रकारिता समाज परिवर्तनाची नांदी–माजी मंत्री आ.संजय कुटे

**जळगाव । प्रतिनिधी**

पत्रकारिता हे पवित्र कार्य आहे. पत्रकारांनी कोणाविषयी लिहले तर त्यांनी ते सकारात्मक घ्यावे व त्यातून पुढची दिशा ठरवावी. मात्र पत्रकारांनी आपल्या लिखानामुळे कोणाचे आयुष्य उध्वस्त होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच पत्रकारांनी संसाराकडे लक्ष देऊनच पत्रकारिता करावी. मी विधानसभा सभागृहात पश्चिम विदर्भाविषयीच्या समस्या ३ वेळा मांडल्या आहेत. अमरावती विभागातील पत्रकारांनी सुध्दा पश्चिम विदर्भाला प्राधान्य देत या परिसरातील बाबींवर विशेष लिखान करावे. सकारात्मक पत्रकारिता ही समाज परिवर्तनाची नांदी आहे असे प्रतिपादन माजी मंत्री, आमदार डॉ. संजय कुटे यांनी केले. तसेच पत्रकारांच्या पाठीशी नेहमी असल्याचे सुध्दा त्यांनी सांगितले. ते जळगाव (जामोद) येथील बऱ्हाणपूर रोडवर असलेल्या देवाशिष लॉन्स येथे गुरूवारी आयोजित अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या एक दिवसीय खुले राज्यस्तरीय अधिवेशनात उद्घाटनीय भाषणात बोलत होते. या अधिवेशनाचे आयोजक अखिल भारतीय पत्रकार संघ तर संयोजक आम्ही जळगांवकर पत्रकार होते.

या अधिवेशनाच्या प्रथम सत्रात सकाळी उद्घाटन समारंभ झाला. याचे उद्घाटन माजी मंत्री,आमदार डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते झाले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ. भा. ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने, प्रमुख पाहुणे म्हणून राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष तथा दै.लोकमत मुंबई चे सहयोगी संपादक यदु जोशी, आय.एन.एस. समिती, नवी दिल्ली चे कार्यकारी सदस्य तथा दै. हिन्दुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, अमरावती विभागीय



अधिस्विकृती समितीचे सदस्य तथा दै. वृत्तकेसरी अमरावतीचे संपादक जयराम आहुजा, अमरावती विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष रवींद्र लाखोडे, दै. महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक, अमरावती विभागीय अधिस्विकृती समिती सदस्य सुरेंद्रकुमार आकोडे, गोपाल हरणे, अ. भा. ग्रामिण पत्रकार संघाचो केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान, केंद्रीय महासचिव सुरेश सवळे, केंद्रीय सचिव अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख, महिला मंच प्रदेश अध्यक्ष जयश्री पंडागळे, केंद्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, केंद्रीय सदस्य माणिक ठाकरे, प्रदीप जोशी, केंद्रीय संपर्क प्रमुख प्रा.रवींद्र मेंढे, केंद्रीय सदस्य बाळासाहेब सोरगीवकर, मनोहर चरपे, संजय कदम, अभिमन्यू भगत, अंबादास सिनकर, कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे, राजेंद्र माळवे, मनोज कमटे, अनुप गवळी, प्रताप मोरे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला स्वागतगीत संजय तल्हार यांनी सादर केले तर प्रास्ताविक प्रदेशाध्यक्ष कैलासबापू देशमुख यांनी केले. यानंतर यदु जोशी, विलास मराठे, रवींद्र लाखोडे, मनोहर सुने यांनी मनोगत व्यक्त केले. तर व्दितीय सत्र दुपारी झाले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी दै. महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव डॉ. स्वाती संदिप वाकेकर, राजर्षी शाहू परिवार तथा संकल्पक वन बुलढाणा मिशनचे अध्यक्ष संदिप शेळके, मिना राहीज, वर्षा घाडगे, भावना सरनाईक आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांसह माधुरी शर्मा, महाराष्ट्र प्रदेश संपर्कप्रमुख रवींद्र तिराणीक यांसह इतर पत्रकारांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन अनिल अभिमन्यु भगत व कांचन मुरके यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. रवींद्र मेंढे यांनी केले. या अधिवेशनाच्या यशस्वीतेकरिता अ.भा.ग्रा. पत्रकार संघ, जळगाव जामोद तालुका कार्यकारीणी, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, नांदगाव खंडेश्वर, अमरावती व इतर कार्यकारीणीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. या अधिवेशनात चांदा पासून तर बांदा पर्यंत सर्व राज्यभरातील पत्रकार बांधव सहभागी झाले होते.

### पत्रकारांच्या समस्यांचा अहवाल शासनाला देणार

**ग्रामिण भागातील पत्रकारांच्या समस्यांची मला कल्पना आहे. महाराष्ट्रातील पत्रकारांच्या समस्या घेऊन यासंबंधीचा अहवाल काही दिवसांतच शासन दरबारी देणार आहो. त्यामुळे यातील जास्तीत जास्त विषय मार्गी लागावे याकरिता आमदार डॉ. संजय कुटे यांनी सहकार्य करावे अशी विनंती यावेळी राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी केली.**

### अधिवेशनात मांडले २३ ठराव

**प्रिंट मिडीया व इले. मिडीयाकरीता पत्रकार कल्याण महामंडळ स्थापण करण्यात यावे, तालुका स्तरावर पत्रकार भवनाचे बांधकाम करण्यात यावे, पत्रकाराच्या शिबीर व कार्यशाळाकरीता अनुदान देण्यात यावे, ग्रामीण व शहरी पत्रकारांसाठी म्हाडा मार्फत स्वतंत्र घरकुल योजना राबविण्यात यावी, पत्रकारांच्या सुरक्षीततेच्या हमीसह विमा योजना शासनाने लागू करावी, पत्रकारांना (५ वर्ष सेवा पूर्ण झालेले) मानधन लागु करण्यात यावे व ६० वर्षानंतर पेंशन योजना लाभ मिळावा, विना परवानगी व्देष भावनेतून ग्रामीण व शहरी पत्रकारांवर न्यायालयीन खटले, अथवा पोलीस कार्यवाही जिल्हाधिऱ्यांच्या परवानगीशिवाय गुन्हा नोंद करण्यात येवू नये, पत्रकारांना वृत्तसंकलनाच्या कामाकरीता एस. टी. व रेल्वेमध्ये विनाअट सवलत मिळावी यांसह विविध २३ ठराव या अधिवेशनात मांडून त्याची प्रत शासनाकडे पाठविण्यात आली.**

# वनपरिक्षेत्र अधिकारी अडकला एसीबीच्या जाळ्यात

## अटकेच्या कारवाईने वनविभागात खळबळ

**गडचिरोली । प्रतिनिधी**

आलापल्ली वनविभाग अंतर्गत येत असलेल्या पेरमिलीचे वनपरिक्षेत्र अधिकार्याला ५ लाख रुपयांची लाच घेताना अटक करण्यात आली आहे. रस्त्याच्या कामावरील पकडलेले ट्रॅक्टर सोडण्यासाठी आणि दंड कमी करण्यासाठी त्याने १० लाख रुपयांची मागणी केली होती. प्रमोद आनंदराव जेनेकर असं लाचखोर वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याचे नाव आहे. ही कारवाई गडचिरोली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी (४ जानेवारी) रोजी रात्रीच्या सुमारास केली.

तक्रारदार रस्त्याचे काम करतो. तुमरगुंडा ते कासमपल्लीपर्यंत रस्त्याचे काम सुरू होते. त्या कामावर सुरू असलेले काही ट्रॅक्टर वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद जेनेकर यांनी पकडली होती. ती वाहने सोडण्यासाठी व आकारलेले ७२ लाखांचा दंड कमी करण्यासाठी त्यांनी तब्बल १० लाखांची मागणी केली होती. तडजोड अंती ५ लाख रुपये देण्याचे ठरले. मात्र,




संबंधित तक्रारदाराला लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. या अनुषंगाने सापडा रचण्यात आला असता, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद जेनेकर यांनी ५ लाख रुपयांचा लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. विशेष म्हणजे लाचखोर प्रमोद आनंदराव जेकर यांच्या पेरमिली शासकीय निवासस्थानी झळती घेतले असता ८५ हजार रुपये रोख रक्कमही मिळाले.सदर कारवाई पेरमेली येथे करण्यात आली असून ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक राहुल माणकीकर अँटी करप्शन ब्युरो नागपूर, सचिन कदम अप्पर पोलीस अधीक्षक अँटी करप्शन ब्युरो नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक श्रीमती अनामिका मिर्झापुरे अँटी करप्शन ब्युरो गडचिरोली, पोलीस निरीक्षक श्रीधर भोसले, सुनील पेद्दीवार, किशोर जंजारकर, संदीप घोरमोडे, संदीप उडान, नरेश कस्तुरवार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली यांनी केले.

# माजी क्रिकेटर अनिल कुंबळे निमढेला गेट (रामदेगी) पर्यटन सफारी करीता दाखल

## भानुसखिंडी वाघिन व तिचे बच्चे यांचे दर्शन

**चिमूर । प्रतिनिधी**

देश विदेशात व्याघ्र दर्शनासाठी प्रसिद्ध असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे दर्शन घेण्यासाठी दरवर्षी देश विदेशातील अनेक सिनेकलाकार, नामवंत क्रिकेटपटू,मंत्री येत असून या सोबतच सुप्रसिद्ध क्रिकेटर सचिन तेंडुलकर हे दरवर्षी या व्याघ्र प्रकल्पाला भेट देत असतात त्यांच्या कुटुंबालाही या व्याघ्र प्रकल्पाचा मोह लागला असून दर वर्षी ते आपल्या कुटुंबास येत असतात. परंतु आज क्रिकेटर सचिन तेंडुलकर यांचे सहकारी मित्र सुप्रसिद्ध पूर्व क्रिकेटर अनिल कुंबळे यांनी देखील या व्याघ्र प्रकल्पाला भेट देत जंगलाची सफारी करून भानुसखिंडी वाघीण व तिचे तीन बच्चे यांची दर्शन घेत प्रेमात पडले असल्याचे त्यांनी सांगितले.



या नंतर देखील दरवर्षी आवर्जून या प्रकल्पाला भेट देण्याची ग्वाही त्यांनी दिली.मागील वर्ष भरा पासून निमढेला गेट वर सिलेब्रेटी तसेच क्रिकेटर यांचा ओढा वाघाना पाहण्यासाठी करिता बफ्फर क्षेत्रातील निमढेला गेट वर वाढत असून गेट वरील उत्तम नियोजन आणी गेट इन्चार्ज मिलिंद किटे यांचा तसेच गेट वरील व्यवस्थापन यांचा कडून मिळणारे आदर यांच्यामुळे तसेच या परिसरात छोटा मटका, भानुसखिंडी वाघीण व तिचे बच्चे वाघ दिसण्याची हमी असल्याने मोठ मोठे सिलेब्रेटी आता निमढेला गेट वर येऊन व जंगल सफारी करून वन्य प्राण्यांचे मनसोक्त दर्शन घेऊन आनंद व्यक्त करीत आहेत.

# संतनगरी शेगांवसाठी भक्तांची पायदळ वारी

**चिमूर । प्रतिनिधी**

विदर्भाची पंढरी असलेल्या संतनगरी शेगांव येथे श्री गजानन महाराजांच्या दर्शनासाठी भिसी येथील भाविक भक्तगण मागील कित्येक वर्षांपासून पायदळ वारी करून जात असतात. शेगांवच्या संत गजानन महाराजांच्या देवस्थानाला भाविक मोठ्या क्ष्रध्देने पायदळ वारी करून संतदर्शनाचा लाभ घेत शेकडों किलोमीटरचा प्रवास सुखकर करीत असतात.भिसी येथील व परिसरातील श्री संत गजानन महाराज भक्तांची पायदळ वारी ३ जानेवारी ते १६ जानेवारी पर्यंत राहणार असुन परतीचा प्रवास होणार आहे. पायदळ वारी मध्ये ५१ भक्त सहभागी झाले आहे. भिसी येथील ऐतिहासिक हेमाडपंथीय शिव मंदिर परिसरातील गजानन महाराजांच्या मंदिरात भक्तगणांनी विधिवत पुजा –आरती, धार्मिक विधी पार पाडला. वारकऱ्यांची भजन दिडीं, भगव्या पताकासह गावातील प्रमुख मार्गाने मिरवणुक काढण्यात आली.दरवर्षी शेगांवला श्री च्या दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांच्या वारीतील मिरवणुकीत पुयारदंड, गडपिपरी, आंबोली, कपर्ला, बोरगांव, मांगलगांव, टिटवी, आंबेनेरी, येरखेडा, जामगांव, कन्हाळगांव, चिखली, वाढोणा, चिचोली आदी परिसरातील भजन मंडळे सहभागी होत असतात. यावेळी पालखी सोहळा बघण्यासाठी भिसी व परिसरातील भावीक आवर्जून उपस्थिती दर्शवितात.हि पायदळ वारी ८ जिल्हे ६ तालुक्यातील पांजरेपार, सिर्सी, गिरगांव, समुद्रपुर , मांडगांव, तरोडा, काजी करंजी, वर्धा, क्रूष्णगिरी



मठ धोतरा, पुलगांव, तळेगांव दशासर, वाघेडा, पिंपळगांव निपानी, शिवण, कोंडबी फाटा, बोरगांव मंजु, अकोला, नागझरी, गजानन महाराज मंदिर शेगांव, या गावातुन रात्रौच्या दरम्यान विश्रांती घेऊन मार्गक्रमण करणार आहे.पायदळ वारी करणारे भक्त हे ४०० कि. मी. चा प्रवास करणार आहे. मार्गातील गांवकरी या भक्तांचे व पालखी सोहळ्याचे दर्शन घेऊन आदरतिथ्य करीत असतात.पायदळ वारीचा प्रवास हा १४ दिवसाचा असल्याने शेवटच्या दिवशी भिसी येथील शेकडों भक्तगण शेगांवातील माऊलीच्या मंदिराकडे पोहचुन 'श्री ' चे दर्शन घेत असतात.शेगांवला जाणाऱ्या पायदळ भक्ताचा प्रवास सुखदायक व्हावा म्हणून भिसी परिसरातील सेवाभावी भक्त आप –आपल्या परिने सेवा देत असतात. भक्तगणांच्या पायदळवारीच्या आगमनानंतर 'श्री ' चा माऊली प्रगटदिन मोठ्या उत्साहात साजरा करीत असतात.

# दहेगाव येथे दशग्राम कृषी महोत्सव साजरा

**पुलगाव । प्रतिनिधी**

देवळी तालुक्यामध्ये फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री व सोशिओ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट फौंडेशन नवी दिल्ली,अर्थसहाय्यित विचार विकास सामाजिक संस्था,वरोरा व अफार्म,पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने ' महाराष्ट्र ग्रामीण उपजीविका सक्षमीकरण प्रकल्प 'अंतर्गत स्थापित दशग्राम शेतकरी उत्पादक कंपनी लि. देवळी तर्फे शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकास करीता कृषी महोत्सव दिनांक ०३ जानेवारी २०२४ रोजी जि.प. शाळा प्रांगण ( ग्राउंड ) दहेगाव (धांदे) येथे आयोजित करण्यात आला.

गावातच शाश्वत उपजीविकेचे विविध स्रोत निर्माण व्हावे व त्याची माहिती, प्रचार,प्रसार इतर शेतकरी वर्गाला व्हावी,या उद्देशाने महाराष्ट्र ग्रामीण उपजीविका सक्षमीकरण प्रकल्प अंतर्गत देवळी तालुक्यातील दहेगाव ( धांदे ) येथे दशग्राम शेतकरी मेळावा घेण्यात आला. देवळी तालुक्यामधील १० गावांमध्ये हा प्रकल्प राबवण्यात येत आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून दशग्राम शेतकरी उत्पादक कंपनी लि. स्थापन करण्यात आली आहे. या कंपनीच्या माध्यमातून ग्रामीण स्तरावर उपजीविका शाश्वत होण्याच्या दृष्टीने कृषी विकास, पशू विकास, स्वयंरोजगार निर्मितीसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येत आहे. व्यवसाय उभारणी करिता फिरता निधी देण्यात येते तसेच शासकीय योजनेचा समन्वय साधण्याकरता व प्रकल्प अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रम व प्रयोग करण्यात आले असून त्याची माहिती देण्यासह प्रदर्शन भरवण्याकरता ३ जानेवारी २०२४ रोजी देहेगाव (धांदे) येथे दशग्राम शेतकरी मेळाव्याचे नियोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात गावात कृषी दिंडी काढून करण्यात आली. दिंडीत शेतकरी महिला व पुरुष तसेच गावातील लहान मुलांनी शेतकरी



**महोत्सव मधील कृषी प्रदर्शन ठरले आकर्षणाचा केंद्रबिंदू :– कृषी संबधित नाविन्यपूर्ण अवजारे, जातिवंत पशुधन, जैविक कृषी निविष्ठा, शेतमाल प्रक्रिया उद्योग, कृषी संबधित जोड व्यवसाय, नाविन्यपूर्ण पशुखाद्य, नवीन शेती आधारित तंत्रज्ञान, फळबाग, भाजीपाला, तृणधान्य, कडधान्य,असे विविध उपक्रम व प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.प्रदर्शन मधील जाफराबादी मैस ही शेतकऱ्यांना आकर्षणाची केंद्र बिंदू ठरली. तसेच दशग्राम शेतकरी उत्पादक कंपनी ली. तर्फे निर्माण केलेले जैविक कृषी निविष्ठा व कमी किंमतीत उत्तम व दर्जेदार गांडूळ खत. शेतीची गुणवत्ता वाढवण्यासाठी. जमिनी मधली सुपिकता टिकवण्याकरीता रासायनिक खतांवरील उत्तम पर्याय दशग्राम शेतकरी उत्पादक कंपनी ने समोर आणून दिला महोत्सव मधील आपल्या क्षेत्रातील निर्माण होणारे सर्व पिके यांचे विविध स्टॉल द्वारे प्रदर्शन करण्यात आले.**

वेशभूषा परिधान करून दिंडीत मोठ्या प्रमाणत सहभाग घेतला. दशग्राम शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते तसेच प्रकल्पातून कंपनी शेअर्स सभासद धारकांना शेअर्स प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. अधिक्षक कृषी अधिकारी प्रभाकर शिवणकर, उपप्रकल्प संचालक कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा रमेश देशमुख, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषी विज्ञान केंद्र डॉ.जीवन कतोरे, जिल्हा व्यवस्थापक महाबीज जंगलेकर जिल्हा व्यवस्थापक इफको वर्धा सोनुने, समन्वयक श्रीमान नारायण पॉलिटेक्निक वर्धा आशिष चव्हाण, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन राजकुमार गव्हाळे, संचालक कृषी अफार्म, सरपंच दहेगाव धांदे अजिंक्य धांदे, अफार्म टीम, दशग्राम शेतकरी उत्पादक कंपनी चे सर्व संचालक, कर्मचारी, समुदाय संघटक,डिजिटल सखी व गावकरी वर्ग उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .